**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्या समोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रमेश कृष्णाजी असलेकर — अपीलकर्ता
रविवार पेठ, मु.पो.फलटण, जि. सातारा

**विरुध्द**

---

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, रंगशिला देवस्थान,
फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१०.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. रमेश कृष्णाजी असलेकर
रविवार पेठ, मु.पो.फलटण, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा
तर्फे प्रतिनिधी श्री. तानाजी गायकवाड, लेखापाल

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, रंगशिला देवस्थान,
फलटण, जि. सातारा तर्फे प्रतिनिधी श्री. साहेबराव महादेव कोरडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.३.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

न्यासाने विहित मुदतीत माहिती दिली नाही. धर्मादाय आयुक्तांच्या पत्रानंतर न्यासाने शुल्क भरण्याचे पत्र दिले, म्हणून माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. रमेश कृष्णाजी असलेकर यांनी केले.

श्री. असलेकर यांनी धर्मादाय आयुक्तांकडे अर्ज केला होता. धर्मादाय आयुक्तांच्या पत्रानंतर माहिती घेण्यासाठी दोन पत्रे आपण त्यांना पाठविली, परंतु ते आले नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांकडील सुनावणीच्या वेळीही याची कल्पना दिली होती, असे प्रतिपादन न्यासाचे खजिनदार श्री. साहेबराव महादेव कोरडे यांनी केले. माहिती संस्थेशी संबंधित असल्यामुळे अर्ज संस्थेकडे वर्ग केला व आपल्या कार्यालयाकडील माहिती वेळेत दिली. न्यासाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र. ५६६६/२००७ मध्ये दिला आहे. तरीही माहिती देण्यास संस्था तयार आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. तानाजी गायकवाड यांनी केले. ते लक्षात घेता न्यासाने कळविलेले शुल्क भरणे शक्य असल्यास अपीलकर्ता माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्णय लक्षात घेता माहिती देण्याबाबत न्यासावर बंधन घालता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
दि. १६.११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

सर्व राहिवासी
कुंदनकुशलनगर, 'A' बिल्डींग,
१५, एल्फिन्स्टन रोड, किर्लोस्कर कंपनीमागे,
बोपोडी, पुणे - ४११००३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता, **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
शिवाजीनगर विभाग, पुणे - १६

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
खडकी उपविभाग, पुणे - ३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३५ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.९.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - दिनांक २९.४.२००९ रोजी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतचा तपशिल. | |

**विवेचन**

अपीलकर्ता 'सर्व रहिवासी कुंदनकुशलनगर, बोपोडी, पुणे- ३' यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. अपिलासोबत आवश्यक मुद्रांक शुल्क (रु. २०/-) जोडलेले नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) अन्वये अपील व्यक्तीच्या नावे करणे आवश्यक असते, समुहाच्या नव्हे. यास्तव सदर अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. नाथाजी दुलाजीराव पोवार
प्लॉट नं. ४२, श्री. रत्नाप्पा कुंभार नगर
को-ऑप. हौसिंग सोसायटी नं. २, मोरेवाडी,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, करवीर तालुका, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
अध्यक्ष, श्री.रत्नाप्पा कुंभार नगर को-ऑप हौसिंग
सोसायटी नं. २, मोरेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५६ / २००९ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.१.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.६.२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.८.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडले आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. नाथाजीराव दुलाजीराव पोवार यांनी जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, श्री रत्नाप्पा कुंभार नगर को-ऑप हौसिंग सोसायटी यांच्याकडे सोसायटीबाबतची माहिती मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा शासकीय अनुदान नसलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठने रिट पिटीशन क्र. ५६६६ / २००७ मध्ये दिला आहे. त्यानुसार सदर अपील दखल घेण्यायोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७- ११ -२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. अमिन जैनुद्दीन शेख
१२/३६/२, दुर्गादर्शन, यमुनानगर,
निगडी, पुणे - ४४ — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप सचिव,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
पुणे - ४११००१ — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
पुणे - ४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६८ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.८.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.९.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** माहिती-मागणी अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अमित जैनुद्दीन शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे प्रथम अपिलावरील कार्यवाहीच्या मुदतीपूर्वी केलेले असल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. बबन गंगाधर ठुबे
मु. पो. आळे (शेरी मळा),
ता. जुन्नर, जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
कबाल इन्शुरन्स सर्व्हिसेस प्रा. लि.
मित्तल टॉवर्स ११८, बी विंग, ११ वा मजला,
नरिमन पॉइंट, मुंबई - ४०००२१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
कबाल इन्शुरन्स सर्व्हिसेस प्रा. लि.
मित्तल टॉवर्स ११८, बी विंग, ११ वा मजला,
नरिमन पॉइंट, मुंबई - ४०००२१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९० / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.९.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.९.२००९ |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. बबन गंगाधर ठुबे यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या संस्थेविरुध्द अपील केले आहे, ती संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) मधील तरतुदीन्वये सार्वजनिक प्राधिकारण ठरत असल्याबाबतचा कोणताही पुरावा अपीलकर्ता श्री. ठुबे यांनी आयोगाकडे सादर केलेला नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गजाजन प्रभाकर शिंदे
शिंदेवाडी, ता.भोर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे
**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी,
क्र.१७, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गजाजन प्रभाकर शिंदे
शिंदेवाडी, ता.भोर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी,
क्र.१७, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री.उत्तमराव पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.१०.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.३०.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मौजे शिंदेवाडी, ता.भोर, जि.पुणे येथील आपले क्षेत्र पुणे-सातारा महामार्गाच्या कात्रज घाट बाह्यवळण मार्गासाठी संपादित केले. राहिलेल्या क्षेत्रात जाण्या-येण्यासाठी पूर्वापार वहिवाटीचा कच्चा रस्ता होता. ती जमीन संपादित झाल्याने वहिवाट संपुष्टात आली असल्यामुळे नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.गजानन प्रभाकर शिंदे यांनी केली.

संपादित केलेल्या जागेची नुकसानभरपाई दिलेली नाही. रस्ता मिळावा अशी श्री.शिंदे यांची मागणी आहे व वेगवेगळ्या नावांनी ते याबाबत अर्ज करीत असतात. वहिवाटीचा हक्क त्यांना न्यायालयातून ठरवून घ्यावा लागेल याची कल्पनाही त्यांना देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी, क्र.१७, पुणे श्री.उत्तमराव पाटील यांनी केले. अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. नुकसानभरपाईची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२७.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संपत पांडुरंग आबदार
'अवधूत', जयभवानी कॉलनी,
रिंगरोड, फुलेवाडी, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६ / कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - रस्ता सुधारणा व त्यामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबत. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संपत पांडुरंग आबदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. भास्कर बाळु कांबळे
ओम सोनाली अपार्टमेंट, तळ मजला
काळा तलावासमोर, ठाणकर पाडा,
कल्याण (प.), जि. ठाणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिष्ठाता,
छ. शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अधिष्ठाता,
छ. शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय यांचे कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७२ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.८.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.९.२००९ |
| ४ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>** -<br>माहिती-मागणी अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. भास्कर बाळु कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोब आवश्यक असणारे मुद्रांक शुल्क (रु. २०/-) जोडले नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलाव कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि. २५-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री
'शारदा', गुलमोहर पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे-४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा इन्स्टिट्यूट लाईडली वुड
एज्युकेशन ट्रेनिंग ऑफ डेव्हलपमेंट, पुणे-१४ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा इन्स्टिट्यूट लाईडली वुड
एज्युकेशन ट्रेनिंग ऑफ डेव्हलपमेंट, पुणे-१४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००९ |

**३. उपस्थित**
**अपीलकर्ता** श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री
'शारदा' गुलमोहर पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८, दि.२५.२.२००९, दि.१८.३२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर असल्यामुळे दि.१९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

इन्स्टिट्यूट लाईडली वुड एज्युकेशन ट्रेनिंग ऑफ डेव्हलपमेंट या संस्थेकडून कोणतीही माहिती दिली जात नाही. तेथील पॅथॉलॉजी लॅबमध्ये अयोग्य पध्दतीचे शिक्षण दिले जात असल्यामुळे जिवितहानी होऊ शकते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री यांनी केले.

या संस्थेची नोंदणी, तिला मिळणारे शासकीय अनुदान आदिंबाबतची माहिती व या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो की नाही याबाबतचा अभिप्राय राज्य माहिती आयोगाने शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडून मागविला होता. सदर संस्था पूर्णपणे खाजगी असून ती शैक्षणिक संस्था / शाळा नाही. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे तिची नोंदणी नाही व संस्थेवर शासनाचे नियंत्रण नाही, कोणतेही अनुदान दिले जात नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसून हा अधिनियम तिला लागू होत नाही, अशी संचालनालयाची धारणा असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी(माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे श्री.उ.शं.शिंदे यांनी दि.३.४.२००८ च्या पत्राने आयोगाला सादर केले आहे. ते लक्षात घेता अपीलकर्त्याची मागणी मान्य करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२५.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. विकास वासुदेव पाठक
"वासुदेव कृपा ," श्रीकृष्ण कॉलनी,
उपळाई रोड, देशमुख प्लॅट, शिवाजीनगर,
बार्शी जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

१) **अपिलीय प्राधिकारी तथा** पोलिस उपअधिक्षक,
सोलापूर (ग्रामीण), सोलापूर
२) मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी** पोलिस उप अधीक्षक,
सोलापूर (ग्रामीण) यांचे कार्यालय
२) नगर अभियंता, बार्शी नगर परिषद, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७८ /२००९/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.४.२००९ दि. ३०.७.२००९. |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.८.२००९ दि. १.८.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.९.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.१०.२००९ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-<br>१) पोलिस अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवा अभिलेखाबाबत.<br>२) बार्शी नगरपरिषद हद्दीतील बांधकाम मंजुरीबाबत. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. विकास वासुदेव पाठक यांनी एकापेक्षा अनेक माहिती - मागणी अर्जांसाठी राज्य माहिती आयोगाकडे एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे

आवश्यक आहे. यास्तव श्री. पाठक यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.११.२००९

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री
'शारदा', गुलमोहर पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे-४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, नेव्हिल वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट
स्टडीज अँड रिसर्च, १५ प्रिन्सिपल व्ही.के.जोग पथ, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा रजिस्ट्रार, नेव्हिल वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट
स्टडीज अँड रिसर्च, १५ प्रिन्सिपल व्ही.के.जोग पथ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री
'शारदा', गुलमोहर पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे-४

**जन माहिती अधिकारी** तथा रजिस्ट्रार, नेव्हिल वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट
स्टडिज अँड रिसर्च, १५ प्रिन्सिपल व्ही.के.जोग पथ, पुणे श्री.शरद विश्वनाथ गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.२५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.१९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

नेव्हिल वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज अँड रिसर्च या संस्थेकडून योग्य माहिती मिळाली नाही, अशा कारणावरून अपीलकर्ता श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्याला असंबध्द व खोटी माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन श्री.अग्निहोत्री यांनी केले. संस्थेला कायम विनाअनुदानित तत्त्वावर परवानगी देण्यात आली असून शासनाकडून कोणतीही मदत, सवलत, जमीन, अनुदान प्राप्त झालेले नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही व हा अधिनियम संस्थेला लागू नाही, अशी संस्थेची भूमिका आहे. तरीही श्री.अग्निहोत्री यांनी विचारलेल्या प्रश्नावरील माहिती रजिस्टर्ड टपालाने एका आठवड्यात देण्यात आली आहे, असे प्रतिपादन संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा रजिस्ट्रार, नेव्हिल वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज अँड रिसर्च श्री.शरद विश्वनाथ गायकवाड यांनी संबंधित माहितीच्या प्रतीसह केले. त्यावरून अपीलकर्त्यास माहिती देण्यात आल्याचे दिसते. या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, असे अपीलकर्त्याचे म्हणणे असल्यास त्याबाबतचे पुरावे त्यांनी आठ दिवसात

आयोगाला सादर करावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु अशा प्रकारचे कोणतेही पुरावे श्री.अग्निहोत्री यांनी आयोगाला सादर केलेले नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२७.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

कर्नल अनिल काक (सेवानिवृत्त)
६४/६७, धार कोठी, इंदोर (मध्य प्रदेश),
४५२००१ — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे - ४११००१ — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**
सा. बां. इमारत विभाग, शासकिय दूध डेअरी आवार,
मुंबई-पुणे महामार्ग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७९ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.४.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.५.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.७.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.८.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** सन १९९८-९९ व १९९९-२००० या कालावधीतील शेतजमिनीच्या संपादनाबाबत. | |

## विवेचन

अपीलकर्ता कर्नल अनिल काक यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलसोबत आवश्यक मुद्रांक शुल्क / पोस्टल ऑर्डर (रु. २०/-) जोडले नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणेः-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संपत पांडुरंग आबदार
'अवधूत', जयभवानी कॉलनी,
रिंगरोड, फुलेवाडी, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६८ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१०.२००६ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१.२००७ |
| ४ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती** - सार्वजनिक बांधकाम विभाग कोल्हापूर अंतर्गत उपलब्ध निधीच्या गैरवापराबाबत व अपहाराबाबत. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संपत पांडुरंग आबदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. भिकचंद रामनारायण बिर्ला
२५, विश्रामनगर, होडगी रोड, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
लघू पाटबंधारे मंडळ (स्था. स्त) पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
लघू पाटबंधारे विभाग (स्था स्त.) सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९५ /२००९/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६/७/२००९ रोजीचे एकूण ५ अर्ज. |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.८.२००९ |
| ४ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- साठवण तलाव, कोल्हापूर पध्दती बंधारे या कामांचा पायाभरणी तपशील, निविदांची माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. भिकचंद रामनारायण बिर्ला यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकूण ५ माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र अपील करणे आवश्यक असल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
दि. २७.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर** (४४)

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. बाळकृष्ण लक्ष्मण नलावडे
३०१, अबोली बिल्डिंग, स्वराली हौ. सोसायटी, **अपीलकर्ता**
एम. आय. टी. रोड, कोथरुड, पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
१) उद्यान अधीक्षक, पुणे महानगरपालिका, पुणे **उत्तरवादी**
२) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी तथा**
१) सहाय्यक उद्यान अधिक्षक, संभाजी पार्क, पुणे महानगरपालिका, पुणे
२) क्षेत्रिय अधिकारी, कर्वे रोड वॉर्ड, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६१ / २००९ / पुणे |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** स. नं. १२५ अ-ब, कोथरुड बेडेकर गणपती एम. आय. टी. रस्ता येथील नियोजित ज्ञानेश्वर उद्यानाचे जागेत हास्यक्लब या संस्थेच्या अतिक्रमणाबाबत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण लक्ष्मण नलावडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतेही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी आयोगाकडे केलेल्या अर्जावरुन त्यांनी एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जासाठी एकत्रित अपील केले असल्याचे दिसून येते. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब श्री. नलावडे यांच्या या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६-११-२००९**